Admi.app.

जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बीड.
"सहकार शक्ती" ईमारत,जालना रोड बीड, ता.जिल्हा बीड.
फोन- ०२४४२-२२२३२१ फॅक्स- ०२४४२-२२२५३४ ई मेल- ddr bid@rediffmail.com

जा.क्र.जिऊनि/प्रशासन/ बीडजिल्हाकृषिऔद्योगिक/संस्था/कलम७३(आय)(२) व ७७(अ)प्र.नियुक्ती/२०१८ दिनांक. २७ फेब्रुवारी-२०१८

४२०

**वाचा :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (आय) (२) व ७७ (अ)**

---

ज्याअर्थि, **बीड जिल्हा कृषि औद्योगिक सर्व सेवा सहकारी संस्था म.बीड जिल्हा बीड** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार नोंदणी करण्यात आली असुन या संस्थेची नोंदणी दिनांक **१९ जुन-१९७४** रोजी झालेली असुन तिचा नोंदणी क्रंमाक **6280** असा आहे.

ज्‍याअर्थि, श्री.बी.आर.सरवदे,विशेष लेखापरीक्षक वर्ग-२,सहकारी संस्था (दुग्ध),बीड यांनी संस्थेचे दिनांक ०१ एप्रिल-२०१६ ते दि.३१मार्च-२०१७ कालावधीचे लेखापरीक्षण पुर्ण केले असुन सदर लेखापरीक्षण अहवालामधील पान क्र.२१ वर क्र.४ कार्यकारी मंडळ-एकुण १३ सदस्यांचे विद्यमान संचालक मंडळ असुन संचालक मंडळाची मुदत दिनांक २० जुन-२०१३ रोजी संपलेली असुन नवीन संचालक मंडळ निवडणुकी बाबतची कार्यवाही ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार पुर्ण केलेली नाही असे नमुद केलेले आहे.संस्थेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ हा दिनांक **२० जुन-२०१३** रोजी संपलेला असुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (आय) (२) मधील तरतुदीप्रमाणे समितीची मुदत संपण्यापूर्वी कलम ७३ कब च्या पोटकलम (१४) अन्वये तरतुद केल्या प्रमाणे संस्थेने निवडणूक घेण्यासाठी मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांना कळविणे ही संस्थेच्या संचालक मंडळाची जबाबदारी आहे. तथापी संस्थेने या तरतुदींचे पालन केलेले नाही.

ज्याअर्थि, संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत दिनांक **२० जुन-२०१६** रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर संस्था निवडणूकीस पात्र झाली असल्याने निवडणूक विहित मुदतीत होण्याचे दृष्टीने संचालक मंडळाने मतदार यादी व निवडणुक निधी विहीत मुदतीत सादर केलेली नाही त्यामुळे संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (२) चे उल्लघंन केलेले आहे.

ज्याअर्थी, संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत संपलेली असुन सांप्रतचे संचालक मंडळाने संस्थेची निवडणूक घेणेसाठी आवश्यक ती कार्यवाही केलेली नाही.

त्याअर्थी ,संस्थेचे सांप्रतचे संचालक मंडळाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क ब (१४) व ७३ आय (२) मधील तरतुदीनुसार जबाबदारी पार पाडण्यास कसुर केलेला आहे व त्यामुळे सांप्रतचे संचालक मंडळ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ७७ अ अन्वये बरखास्त करुन संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे आवश्यक झालेले आहे अशी माझी खात्री झालेली आहे त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## -:- आदेश -:-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी **एस.पी.बडे,जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड** मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार बीड जिल्हा कृषि औद्योगिक सर्व सेवा सहकारी संस्था म.बीड जिल्हा बीड या संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करुन श्री.अमर एन.शिंदे,उपनिबंधक, सहकारी संस्था,तालुका बीड यांची संस्थेचा दैनंदिन कारभार पहाण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.त्यांनी सहा महीन्याच्या कालावधीत नवनिर्वाचित संचालक मंडळ निवडणुकीद्वारे नियुक्त होईल अशी कार्यवाही करावी.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्कयानिशी आज दिनांक **२७ फेब्रुवारी-२०१८** रोजी दिला असे.

२७.२.१८

**( एस.पी.बडे)**
**जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,बीड**